**प्रेस नोट** **ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**

**दि.०५.०९.२०२२**

आरोपी अनिल सुधाकर सासनीक, वय–३५ वर्षे, व्यवसाय–इलेक्ट्रीकचे खाजगी काम यांनी १०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणुन ला.प्र.विभाग,जळगांव यांची कारवाई.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **घटक** | :– | जळगांव. |
| २ | **गुन्हा नोंद कंमाक** | :– | एम.आय.डी.सी. पो.स्टे. गु.र.नं.०६७४/२०२२ |
| ३ | **कलम** | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७ अ प्रमाणे. |
| ४ | **आरोपीचे नांव व कार्यालय** | :– | अनिल सुधाकर सासनीक, वय–३५ वर्षे, व्यवसाय–इलेक्ट्रीकचे खाजगी काम रा.प्लॉट नं.७, श्रद्धा कॉलनी, महाबळ जळगांव मुळ रा.तहसिल ऑफिसच्या मागे, आनंद नगर, जिंतुर ता.जिंतुर जि.परभणी<br>(खाजगी इसम) |
| ५ | **मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम** | :– | दि.२२/०८/२०२२<br>१०,०००/–रुपये लाचेची मागणी |
| ६ | **स्विकारलेली लाचेची रक्कम** | :– | निरंक |
| ७ | **गुन्हा दाखल तारीख** | :– | दि.०५/०९/२०२२ |
| ८ | **थोडक्यात माहीती** | :– | यातील फिर्यादी यांचा MIDC जळगांव येथे कार रिपेअरिंगचा व्यवसाय आहे. त्यांनी त्यांनी व्यवसायासाठी प्लॉट नं.१/२ हा विहीत भाडे करार करुन कारच्या रिपेअरींगसाठी शेड बांधलेले आहे.सदर प्लॉटचे जुलै २०२२ या महिन्याचे वाढीव लाईट बिल आले होते.त्याबाबत फिर्यादी यानी MSEB कार्यालयात जावुन तेथील उप अभियंता सुरेश पाचंगे यांची भेट घेतली तेव्हा उप अभियंता सुरेश पाचंगे यांनी फिर्यादी यांना तुमच्या लाईट बिलामध्ये मंजुर कनेक्टेड लोड हा २ KW ऐवजी १८ KW करुन घ्यावा लागेल. त्यासाठी तुम्ही अनिल नावाच्या खाजगी इसमार भेटुन घ्या तो सर्व प्रोसिजर सांगेल असे सांगुन त्याचा फोन नंबर दिला.<br>त्यानंतर फिर्यादी अनिल नावाच्या खाजगी इसमार भेटुल उप भियंता पाचंगे यांनी मला तुम्हाला भेटायला सांगितले आहे. त्यावर अनिल याने लाईट बिल पाहुन तुमचा कनेक्टेड लोड हा २ KW वरुन १८ KW असा ऑनलाईन अर्ज करुन आणुन देण्याच्या मोबदल्यात उप अभियंता सुरेश पाचंगे यांचे नाव सांगुन १०,०००/–रुपये लाच मागणी करीत आहे. त्याबाबत फिर्यादी यांनी दि.२२.०८.२०२२ रोजी ला.प्र.वि.जळगांव कार्यालयाकडे तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची दि.२२.०८.२०२२ रोजी ला.प्र.वि.जळगांव पथकाने पंच साक्षीदार समक्ष पडताळणी केली असता यातील आरोपी अनिल सासनीक, खाजगी इसम याने फिर्यादी यांचे जळगांव MIDC भागात भाडे करार केलेले प्लॉट नं.बी १/२ या प्लॉटचे वाढीव लाईट बिलाचे कनेक्टेड लोड हा २ KW वरुन १८ KW पर्यंत चे काम करुन आणुन देण्यासाठी उप अभियंता सुरेश पाचंगे यांचे नाव सांगुन १०,०००/–रुपयांची लाचेची मागणी केली आहे व सदर लाच रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणुन गुन्हा. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:**– ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.
**ईमेल आयडी:**– dyspacbjalgaon@gmail.com
**संकेतस्थळ:**– acbmaharastra.gov.in
**टोल फ्री कंमाक:– 1064,दुरध्वनी कंमाक:– 0257-2235477**
**व्हॉटस्ॲप कंमाक:– 8766412529**

पोलीस उप अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

06.9.2022

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**